नि.फौ.ख.क्र. २८५/२०२४
सरकार वि. रामदास
नि.क्र. १९

सरकारतर्फे साक्षदार क्रमांक १ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो कि
नाव - यादवरावजी राघोबाजी नागमोते,
वय - ९५ वर्ष, व्यवसाय – शेती,
राहणार – किरणापूर, ता.मौदा, जिल्हा. नागपूर

**सरतपास शपथेवर सरकारतर्फे सरकारी अभियोक्ता श्रीमती जे.व्ही. हेडाऊ द्वारा**

१. आरोपीचे शेत माझ्या शेताला लागून असल्या कारणाने मी त्याला ओळखतो. घटना अंदाजे दीड वर्षा आधी ७ व्या महिन्यात घडली होती. आरोपीचे शेत वर आहे व माझे शेत त्याच्या शेताच्या खाली आहे. आरोपीने त्याच्या शेतातील पाणी माझ्या शेतात टाकले. मी त्याला विचारले असता 'तु तुझ्या शेतातील पाण माझ्या शेतात का बरं सोडले', आरोपीने मला कुऱ्हाडीने माझ्या उजव्या खांद्यावर मागून मारले व मला मार लागला. सदर घटनेमुळे मी आरोपीविरूद्ध पो.स्टे. मौदा येथे फिर्याद दिली.

२. आता सदरची फिर्याद मला दाखवली. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझ्या डाव्या अंगठ्याचा ठसा आहे. सदर फिर्याद ला **नि.क्र.२०** देण्यात येत आहे. आता मला सदर फिर्याद ला अनुसरून छापिल प्रथम खबरी अहवाल दाखवला. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझ्या डाव्या अंगठ्याचा ठसा आहे. सदर छापिल प्रथम खबरी अहवाल ला **नि.क्र.२१** देण्यात येत आहे. पोलीसांनी माझे बयाण घेतले होते.

३. आता साक्षदारास आरोपीचे वकिल श्री. आखरे, यांच्या समक्ष जी.पी.क्र.३१/२५ कुऱ्हाड दाखवण्यात आला. साक्षदाराने सदरची कुऱ्हाड ही आरोपीने त्याला मारण्यास वापरल्याचे सांगितले. सदर कुऱ्हाड ला M.O.-1 देण्यात येत आहे. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास अरोपीचे वकिल श्री. एम.जे. आखरे यांच्याद्वारे -**

४. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीसोबत माझे रोज भांडण होत होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीचे शेत वर व माझे शेत खाली आहे. माझ्या शेता खाली नाला आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी मी माझ्या शेतात झाडे तोडत होतो. हे म्हणणे खरे आहे की,

आरोपी त्याच्या शेतात एकटा काम करत होता.

**प्रश्न -** तुम्ही व तुमचा मुलाने आरोपी तुमच्या शेतात पाणी सोडतो म्हणून, त्याला विचारायला गेले ?

**उत्तर -** मी आरोपीला प्रेमाने विचारायला गेलो होतो.

५. हे म्हणणे खरे नाही की, माझा व आरोपीचे भांडण झाल्यामुळे, मी आरोपीच्या अंगावर कुऱ्हाड घेऊन मारायला गेलो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला कुऱ्हाड मारल्यामुळे तो पळू लागला. साक्षदार स्वतहून सांगतो की, उलट आरोपीनेच मला कुऱ्हाड मारली व तो पळाला. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या दिवशी पावसाळ्याचे दिवस होते. हे म्हणणे खरे नाही की, शेतामधे चिखल असल्याकारणने मी त्यावर पाय घसरून पडलो. हे म्हणणे खरे नाही की, मी खाली घसरून पडल्याने माझ्या हातातील कुऱ्हाड खाली पडली व मी सदर कुऱ्हाड वर पडल्यामुळे मला मार लागला. हे म्हणणे खरे नाही की, त्यानंतर मी माझ्या घरी गेलो व माझ्या मुलांसोबत संगणमत करून मौदा पो.स्टे. येथे आरोपीविरूद्ध फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या वैयक्तीक वैमनस्यातून आरोपीविरूद्ध सदरची खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

श्रवणोत्तर स्वीकृत. समक्ष

मौदा. **स्वाक्षरी/-**

दिनांक २९.११.२०२५ (एन.के. वानखडे)

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी मौदा